महाराष्ट्र असोसिएशन ऑफ सोशल वर्क एज्युकेटस (मास्वे ) आणि

*कवयित्री बहिणाबाई चौधरी ,उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ जळगाव ,संलग्नीत*

समता शिक्षण संस्था पुणे-संचालित

# डॉ.बाबासाहेब आंबेडकर समाजकार्य महाविद्यालय मोराणे,धुळे.

***ग्रंथालय यांच्या संयुक्त विद्यमाने वक्तृत्व स्पर्धा***

---

## महाविद्यालय ***स्तरीय वक्तृत्व स्पर्धा*** अहवाल- *2024*

Date:-16/08/2024

कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव सलग्नित समता शिक्षण संस्था पुणे संचालित डॉ. बाबासाहेब आंबेडकर समाजकार्य महाविद्यालय मोराणे ता.जि.धुळे आणि महाराष्ट्र असोसिएशन ऑफ सोशल वर्क एज्युकेटस (मास्वे ) आणि अॅटी रगिंग समिती यांच्या संयुक्त विद्यमाने महाविद्यालयात ग्रंथालयातर्फे वक्तृत्व स्पर्धाचे आयोजन दिनांक 16/08/2024 रोजी करण्यात आले होते.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला भारतीय घटनेचे शिल्पकार भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले.

त्यानंतर वकृत्व स्पर्धेला अध्यक्ष म्हणून महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विष्णू गुंजाळ सर उपस्थित होते. या वक्तृत्व स्पर्धेचे उदघाटन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विष्णू गुंजाळ यांच्या हस्ते करण्यात आले.त्यानंतर वकृत्व स्पर्धेचे अध्यक्ष व महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विष्णू गुंजाळ सर यांचे स्वागत प्रा. ग्रंथपाल गजेंद्र जगदेव बुके देऊन करण्यात आले. तसेच प्रमुख पाहुणे श्री.बाबूलाल बोरसे ( पी एस आय) यांचे स्वागत महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विष्णू गुंजाळ यांनी फुलांचा बुके देऊन केले. महाविद्यालयांच्या वतीने वकतुत्व स्पर्धेचे परीक्षक प्रा.राजेंद्र बैसाणे व प्रा.डॉ.सुवर्णा बरडे मडम यांचे स्वागत श्री. विजय आगळे यांनी बुके देवून केले. प्रा.डॉ. रघुनाथ महाजन यांचे स्वागत श्री. मनोज ठाकरे यांनी केले. तर उपस्थित विदयार्थी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांचे स्वागत शब्द सुमनाने करण्यात आले.

महाविद्यालयाचे प्रा .डॉ. रघुनाथ महाजन यांनी समाजकार्य पंधरवडा आणि शिव्या मुक्त अभियान या संदर्भात प्रास्ताविक केले. त्यानंतर प्रमुख पाहुणे श्री.बाबूलाल बोरसे ( पी. एस. आय.) यांनी आपले मनोगत व्यक्त करताना सांगितले कि, विद्यार्थांनी विविध संदर्भ पुस्तके नियमित वाचली पाहिजेत.किमान

दिवसातून सहा तास अभ्यास केला पाहिजे. त्यांनी विद्यार्थ्यांना वाचनाचे महत्व पटवून दिले. प्रत्येक विद्यार्थ्यांने आपले शिक्षण पूर्ण करीत असतानाच स्पर्धा परीक्षेची उत्तम तयारी केली पाहिजे. आपल्या ग्रंथालयाचा जास्तीत जास्त वापर केला पाहिजे .महाविद्यालय ग्रंथालयामार्फत अनेक उपक्रम व व्याख्याने केली जातात. आयोजित विविध स्पर्धा पैकी वकृतुत्व स्पर्धेत भाग घेऊन संभाषण कला अवगत केली पाहिजे.तरच तुम्ही चांगल्याप्रकारे संभाषण करू शकाल. असे सर्व उपस्थित विद्यार्थ्यांना संबोधित केले. प्रत्येक विषयाचा सखोल अभ्यास केला पाहिजे. त्यानंतर प्रा.डॉ.विष्णू गुंजाळ सर यांनी उद्घाटन प्रसंगी विद्यार्थ्यांना मोलाचा संदेश दिला कि आपण तयारी केलेल्या विषयावर वक्तृत्व सादर करताना महत्वाचे मुद्दे विचारात घेऊन वक्तृत्व सादर केले पाहिजे. प्रत्येक विषयाचा सखोल अभ्यास केला पाहिजे. आणि प्रत्येक सहभागी विद्यार्थीना स्पर्धेसाठी हार्दिक शुभेच्छा देऊन आपले मनोगत व्यक्त केले.त्यानंतर विद्यार्थ्यांनी आपली वकतुत्व सादर केलीत. त्यात सर्वप्रथम अनिल बागुल,विश्वजित वाघ,अरुणा मराठे,देवयानी पाटील ललिता कवर आणि व्हडगर दीपक या विद्यार्थ्यांनी वकतुत्व सादर केले. वक्तृत्व स्पर्धेत विजयी झालेल्या विजेत्यांना पारितोषिके व बक्षीस वितरण महाविद्यालयाचा वार्षिक पारितोषिक वितरणाच्या दिवशी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ विष्णू गुंजाळ,सर यांच्या हस्ते प्रदान करण्यात येणार आहे.

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विष्णू गुंजाळ सर यांनी अध्यक्षीय समारोप प्रसंगी सहभागी सर्व विद्यार्थ्यांचे विशेष कौतुक व अभिनंदन केले . या वक्तृत्व स्पर्धेला महाविद्यालयातील सर्व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.सूत्रसंचालन ललिता कवर हिने केले.तसेच उपस्थित उदघाटक डॉ. विष्णू गुंजाळ सर, प्रमुख पाहुणे श्री.बाबूलाल बोरसे ( पी. एस. आय.) ,प्रा.डॉ.रघुनाथ महाजन ,स्पर्धचे परीक्षक प्रा.डॉ.राजेंद्र बैसाणे प्रा.डॉ.सुवर्णा बरडे इत्यादी, आणि विदयार्थी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांचे महविद्यालयच्या वतीने मनपूर्वक आभार प्रा. गजेंद्र जगदेव यांनी मानले.

ही वक्तृत्व स्पर्धा यशस्वी करण्याकरिता विदयार्थी, शिक्षक व शिक्षकेतर ग्रंथालय कर्मचारी यांनी प्रयत्न केले. ही स्पर्धा 16ऑगस्ट 2024 रोजी यशस्वी पणे संपन्न झाली आहे.

**धन्यवाद !**

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विष्णू गुंजाळ  सर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना.




प्रमुख पाहुणे  श्री.बाबूलाल बोरसे ( पी एस आय) विद्यार्थ्यांना संबोधित करताना




महाविद्यालयाचे प्रा. डॉ. रघुनाथ महाजन  सर वक्तृत्व स्पर्धाचे प्रास्ताविक  करताना.



वक्रतुत्व स्पर्धाचे उद्घाटनप्रसंगी उपस्थित विचारमंच .




वक्रतुत्व स्पर्धत सहभागी होऊन वक्तुत्व सादर करणारे विद्यार्थी




वक्रतुत्व स्पर्धत सहभागी होऊन वक्तुत्व सादर करणारे विद्यार्थी



वक्तृत्व स्पर्धेत  सहभागी होऊन वक्तृत्व सादर करणारे विद्यार्थी




महाविद्यालयाचे उपस्थित सर्व विद्यार्थी







धन्यवाद !

प्रा.गजेंद्र जगदेव

आपला विश्वासू